

# समाजस्वास्थ्य

संपादक
र. धों. कर्वे, एम. ए.

वर्ष २७, अंक ३ रा | १५ सप्टेंबर १९५३ | किंमत ४ आणे



# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | प्रजोत्पत्ति–१ ... ... ... ... | ४१ |
| २. | म्हातारपण आणि कामक्षमता ... ... | ४६ |
| ३. | ग्रंथपरीक्षण ... ... ... ... | ५० |
| ४. | पत्रव्यवहार ... ... ... ... | ५२ |
| ५. | शारदेचें पत्र ... ... ... ... | ५७ |



## अेजंटांचीं नांवें

**मुंबई** : श्री. बाबूराव बागवे, न्यूज एजंट, खटाववाडी, गिरगांव.

**पुणें** : अेल्. के. जोशी, बुकसेलर.
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**अहमदनगर** : पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

**निपाणी** : के. एस्. बळगुर्गी

**आदिलाबाद** : वैद्य ब्रदर्स. नागपूर रोड.

**कुमठा** : आर्. एम्. कामत

**सांगली** : के. बी. मगदूम, स्टेशन राड.


**स मा ज स्वा स्थ्य** मासिक

यांत वाचकांच्या कामविषयक अडचणींना उत्तरें दिलेलीं असतात, परंतु कायद्याच्या अडाणीपणामुळें सर्वच प्रश्नांना मासिकांत उत्तरें देतां येत नाहीत. ज्यांना खाजगी पत्राने उत्तर पाहिजे असेल, त्यांनी आगाऊ वीस रुपये पाठवावे, म्हणजे रजिस्टर पोस्टाने उत्तर मिळेल. **संपादक**.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# प्रजोत्पत्ति–१

परंपरेने चालत आलेल्या निराधार समजुतींना धक्का देणारी चिकित्सक वृत्ति ही आधुनिक प्रगतीची पहिली पायरी होय. निसर्गांत ज्या घडामोडी होत असतात, त्यांचे खरे नियम न समजल्यामुळें खोटे संबंध या जुन्या समजुतींत जोडलेले असतात. या संबंधांना कल्पनेशिवाय कशाचाही आधार नसतो, पण त्या अेकदां रूढ झाल्या म्हणजे त्यांचे परिणाम सामाजिक जीवनावर महत्वाचे होतात. उदाहरणार्थ स्त्रीपुरुषांच्या संभोगाचा पिकांवर परिणाम होतो, ही समजूत पूर्वी पसरलेली होती. संभोगापासून माणसांचें पीक येतें, अेवढाच त्याला आधार. धार्मिक समजुती अशाच प्रकारच्या असतात आणि अेकदां त्यांवर लोकांची श्रद्धा बसली की त्यांची चिकित्सा करणें, त्यांना तर्कशास्त्राची कसोटी लावणें, हें पाप ठरतें. या गोष्टी तर्कशास्त्राच्या पलीकडच्या आहेत, असें धार्मिक लोक सांगत असतात.

प्रत्येक धर्मांत हा प्रकार दिसतो, किंबहुना ही धर्माची कसोटीच आहे. नवीन उत्पन्न झालेल्या मार्क्सवादाला धर्म म्हटलेलें मार्क्सवाद्यांना आवडत नाही, पण तो या कसोटीला उतरतो. मार्क्सवाद तर्कशास्त्राला धरून नाही, असें कोणी म्हटलें तर मार्क्सवादी असेंच उत्तर देतात की आमची विचारपद्धति 'विरोधविकास' ही तर्कशास्त्राच्या पलीकडे आहे, तर्कशास्त्रापेक्षां वरचढ आहे. हें धार्मिक उत्तर आहे, श्रद्धाळू माणसांचें उत्तर आहे.

तर्कशास्त्र हें बुद्धिवाद्यांचें शास्त्र आहे, पण बुद्धिवादाला आकलन होणार नाहीत अशा पुष्कळ गोष्टी जगांत आहेत हें लक्षांत ठेवा, असा उपदेश हे लोक बुद्धिवाद्यांना करीत असतात. बुद्धिवादानें सर्व प्रश्नांचीं उत्तरें मिळतात, अशी घमेंड बुद्धिवाद्यांना नसते. कित्येक बाबतींत ते आपलें अज्ञान कबूल करतात आणि त्याची त्यांना बिलकुल लाज वाटत नाही, पण जुन्या काळच्या तत्वज्ञांना अज्ञानाची लाज वाटत असे. सर्व प्रश्नांचीं उत्तरें आपल्याजवळ आहेत अशी त्यांना घमेंड असे आणि ते वादांत निरुत्तर झाले तरी शेवटीं 'ओीश्वराची करणी अगाध आहे,' हें अेक उत्तर त्यांच्याजवळ असतेंच.

या पारंपरिक वृत्तीला जोराचा धक्का यूरोपांत प्रथम व्हॉलतेर नांवाच्या प्रसिद्ध फ्रेंच लेखकानें दिला. ज्याच्या लिखाणानें फ्रेंच राज्यक्रांतीला प्रोत्साहन मिळालें, त्यांपैकीं हा प्रमुख होता. याच्या लिखाणामुळें धर्माधिकारी सावध झाले आणि आपल्यालाही जपून विधानें केलीं पाहिजेत याची त्यांना जाणीव होऊं लागली. बायबलांतील विधानें देखील सर्वच खरीं मानतां येणार नाहीत आणि मनुष्यप्राणी कदाचित् ओीश्वरानें उत्पन्न केलेला नसून वानरांपासूनच उत्पन्न झाला असेल, असें त्यांपैकीं कांही अधिकारी कबूल करूं लागले, हा तर्कशास्त्राचा विजय आहे. अर्थात् नाअिलाज झाला तरच कबूल करायचें, नाहीतर श्रद्धेलाच चिकटून रहायचें, ही धार्मिक लोकांची वृत्ति यूरोपांतही कायम आहे.

आपल्याकडेही तर्कशास्त्र नव्हतें असें नाही, पण आपल्या तर्कशास्त्रांत अेक मोठा दोष शिरला आणि तो तर्कशास्त्राचा सर्वस्वी नाश करण्यास पुरेसा आहे. तो म्हणजे शब्दप्रामाण्य. तर्कशास्त्रांत आप्तवाक्य, म्हणजे थोरांचें वचन प्रमाण मानणें, म्हणजे तर्कशास्त्राचा खून करणें आहे. अमुक विधान खरें कशावरून, तर कोणीतरी दुढ्ढाचार्यानें म्हटलें आहे म्हणून. हें तत्व अेकदां मान्य केलें की तर्कशास्त्र राहिलें कोठें? हा दुढ्ढाचार्य कितीही मोठा तत्वज्ञ असला, किंवा अगदी आधुनिक शास्त्रज्ञ असला, तरी मनुष्य आहे, चुकीला पात्र आहे, कारण सर्वज्ञ कोणीच नसतो, हें समंजस माण-

साने मान्य केलें पाहिजे आणि हा तर्कशास्त्राचा पायाच आहे. जें अवलोकनाने आणि तर्कशास्त्राच्या नियमांनी अपरिहार्यपणें सिद्ध होईल तेवढेंच मान्य करणें, ही बुद्धिवाद्यांची भूमिका असते, आणि बुद्धिवादी नास्तिक असतात याचें कारण हेंच.

आणि ज्यांनी ईश्वरालाही तर्काची कसोटी लावून तो अमान्य ठरवला, ते जुन्या रूढींना व संस्थांना केवळ त्या जुन्या आहेत म्हणून मान्यता कसे देतील? विशेषतः निषेधात्मक धार्मिक समजुतींना ते बिलकुल भीक घालणार नाहीत. कुटुंबसंस्था व विवाहसंस्था, यांवर समाजाचें स्थैर्य अवलंबून आहे असें जरी कोणीं कंठशोष करून सांगितलें, तरी आजपर्यंत प्रजोत्पत्तीच्या दृष्टीने आणि समाजाच्या सुखाच्या दृष्टीने त्यांपासून काय फायदा झाला आहे, असें विचारल्याशिवाय ते राहणार नाहीत.

यहुदी व क्रिस्ती धर्मीयांना शक्य तितकी प्रजोत्पत्ति करण्याची आज्ञा आहे आणि धार्मिक आज्ञा बदलत्या परिस्थितीप्रमाणें बदलत नसतात, हा त्यांचा मोठा दोष आहे. आज सर्व जगाची लोकसंख्या भरमसाट वाढत आहे आणि अन्नाचा प्रश्न सर्वांना भेडसावीत आहे. अशा वेळीं प्रजा शक्य तितकी वाढवणें समंजस आहे काय, याचा विचार न करून कसें चालेल? अशा स्थितींत पुष्कळ लोक धार्मिक उपदेशाला धाब्यावर बसवतात यांत आश्चर्य काय आणि त्यांना कोण नांवें ठेवील?

आपल्याकडे चिकित्सक बुद्धीची उणीव आहे. फ्रान्स देशांत जे अनेक तर्कनिष्ठ, चिकित्सक बुद्धीचे लेखक होऊन गेले व अजूनही आहेत, त्यांमुळें फ्रान्सची कीर्ति जगभर पसरली. फ्रान्सच्या १७८९ च्या राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यांची घोषणा करून सर्व जग हलवून सोडलें. हिंदुस्थान देश आपल्या उच्च संस्कृतीची प्रौढी मिरवतो, पण प्रत्यक्ष पाहिलें तर काय दिसतें? नेहमींच्या व्यवहारांतील साधा प्रामाणिकपणा देखील हिंदुस्थानांत नाही, हें आतां सर्व जगाला व्यापारांतील हलकटपणामुळें माहीत झालें आहे.

रूढीला फाजील महत्व देणारांना चिकित्सक बुद्धिच नसते, यामुळें सर्व प्रश्न रूढीने सुटतात आणि रूढि बदलली तर कांहीतरी भयंकर प्रसंग येअील, अशी भीति वाटते. कार–सॉंडर्ससारख्या विद्वान समजलेल्या लोकांनी असा अिशारा दिला आहे की संततिनियमन ही सुशिक्षित लोकांची रूढि होऊं पहात आहे, तेव्हां लोकसंख्या जर कमी होऊं द्यायची नसेल, तर शिक्षणाचा फारसा प्रसार होऊं न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. यापेक्षां आणखी मूर्खपणा कोणता? सुशिक्षित लोक विचारस्वातंत्र्याची मागणी करतात, आणि हिटलरसारखे हुकूमशहा विचारस्वातंत्र्याची गळचेपी करूं पाहतात ते अेवढ्याचकरतां की चिकित्सक बुद्धि त्यांच्या विरुद्ध जाअील अशी त्यांना भीति वाटते. परंतु लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार आतां चिकित्सक बुद्धीने केल्यशिवाय कोणत्याही राष्ट्राची धडगत नाही, अितका हा प्रश्न निकडीचा झाला आहे.

लोकसंख्येच्या व अन्नाच्या वाढीची चिकित्सा प्रथम माल्थसने केल्यामुळें त्याने कृत्रिम साधनांचा प्रचार केला असा खोटा आरोप त्याच्या जिवंतपणींच त्याच्यावर कित्येकांनी केला होता, परंतु त्याने फक्त मनोनिग्रहाचाच उपाय सुचवून क्लीबनीतीला पूर्ण पाठिंबा दिला होता, कारण तो पाद्री होता. कामतृप्ति व प्रजोत्पत्ति यांची फारकत करणाऱ्या आधुनिक साधनांचा प्रसार त्याच्या नंतर अितरांनी केला. आतां पाश्चात्य देशांत यांचा अितका प्रसार झाला आहे की ‘ स्त्रीला शक्य तितकीं मुलें व्हावीं ’ ही अगोदरची धार्मिक कल्पना अैकून कोणालाही हसूं आल्याशिवाय रहात नाही. तरीदेखील युद्धाच्या दृष्टीने लोकसंख्या शक्य तितकी वाढली पाहिजे अशा हेतूने कित्येक देशांत कायदे केलेले आढळतात. अर्थात् या कायद्यांचा परिणाम अितकाच होतो की संततिनियमन योग्य मार्गांनी करण्याअैवजीं अपूर्ण संभोगासारख्या हानिकारक मार्गांचा अवलंब लोकांना करावा लागतो. कायदे करणारे लोक त्यांच्या परिणामांकडे बिलकुल लक्ष देत नाहीत, याचें हें अेक उदाहरण आहे. फ्रान्समधें संततिनियमनाचा प्रचार करणें हा गुन्हा आहे व तेथें या कायद्याचा

असाच परिणाम होतो, कारण फ्रेंच लोकांना संततिनियमनाचे फायदे फार दिवसांपासून समजलेले आहेत. याउलट अिंग्लंडांत धार्मिक अधिकाऱ्यांचाही विरोध जवळ जवळ नष्ट झाला आहे. आयर्लंडमधें या प्रचाराला बंदी आहे, कारण तें सरकार धार्मिक आहे (कॅथोलिक पंथ). अमेरिकेंत स्त्रीच्या आरोग्याला धोका असेल तरच संततिनियमनाचा उपदेश करणें कायदेशीर आहे, परंतु या कायद्याचा फारसा उपयोग होत नाही, कारण लोकमत विरुद्ध आहे. जपानांत अगदी खालच्या वर्गांतही संततिनियमनाच्या साधनांची मागणी आहे. या बाबतींत डॉ. कॉक यांनी लिहिलें आहे की गर्भपात, बालहत्या वगैरे प्रकारांविरुद्ध कायदे करून ते बंद होत नाहीत, ते संततिनियमनाच्या प्रसारानेच बंद होणें शक्य आहे. हे मार्ग पूर्वी माहीत नसल्यामुळेंच पुष्कळ देशांत हे प्रकार सर्रास चालू होते व कायदे असले तरी त्यांना कोणी जुमानीत नव्हतें व नाही. कोणत्याही मार्गाने का होईना, लोकसंख्या वाढूं न देण्यातच आपलें हित आहे, हें पुष्कळ प्राथमिक गटांना देखील कळतें आणि कित्येक गटांत असें आढळतें की कोणालाही दोन किंवा फार तर तीन मुलांपेक्षां जास्त नसतात. प्रसिद्ध फ्रेंच समाजवादी लेऑं ब्लं याने लिहिलें आहे की विवाहाशिवाय अेकत्र राहणाऱ्या कित्येक जोडप्यांना कधींही मुलें होत नाहीत. अशा स्थितींत अेखाद्या नवविवाहित जोडप्याला लग्नानंतर नऊ महिन्यांनी मूल झालें, तर बायकोला कांही दिवस तरी स्वातंत्र्याचा उपभोग न घेऊं देणाऱ्या बेअकली नवऱ्याला लोक हंसतात यांत नवल काय? अितका हल्ली संततिनियमनाचा प्रसार यूरोपांत झाला आहे.

अर्थात् येथल्या गांधीछाप लोकांप्रमाणें यूरोपांतही धार्मिक लोकांनी संततिनियमनाला विरोध केलाच व हा विरोध विशेषतः कृत्रिम साधनांबद्दल होता, तेव्हां कित्येकांनी तीं साधनें वापरलीं नाहीत, परंतु जास्त मुलें कोणालाच परवडत नसल्यामुळें गर्भपातांची संख्या भयंकर वाढली, अशी हकीकत जज्ज लिंडसे यांनी दिली आहे. अेका स्त्रीने तीनदां गर्भपात केला. कारण धर्मांत गर्भपाताला बंदी केलेली नाही असें तिने सांगितलें. संतति-

नियमन हा धार्मिक लोक समजतात त्याप्रमाणें नैतिक प्रश्न नाही, आर्थिक प्रश्न आहे. प्राचीन काळीं जेथें फाजील लोकसंख्या होती, तेथे कायद्याने गर्भपाताला व बालहत्येला देखील परवानगी होती, कारण हल्लींचीं साधनें तेव्हां माहीत नव्हतीं. संततिनियमन करावें की नाही, हें ज्याने त्याने आपआपल्या परिस्थितीप्रमाणें ठरवायचें असतें, त्यांत नीति–अनीतीचा संबंध नाही. फ्रान्स, जर्मनी किंवा रशियासारखीं राष्ट्रें युद्धाच्या दृष्टीने जरी आपली लोकसंख्या वाढवण्याचा शक्य तितका प्रयत्न करीत असलीं, आणि त्यांची ही दृष्टि चुकीची असली, तरी त्यांत राष्ट्राच्या जीवनाचाच प्रश्न असतो, नीतीचा नव्हे.

---

# म्हातारपण आणि कामक्षमता

कामक्षमतेचा प्रश्न पुरुषांच्या बाबतींत उपस्थित होतो. स्त्रियांना समागम आवडो किंवा नावडो, त्यांना तो कधीं अशक्य होत नाही, कारण त्यांचे बाबतींत उत्थापनाचा प्रश्न नसतो. पुरुषांचे कामक्षमतेला वयाची मर्यादा नसते, म्हणजे अमुक वयाचा पुरुष नपुंसक असलाच पाहिजे असा नियम नाही. अमेरिकेंतील डॉ. किन्से यांचे पुरुषांच्या कामविषयक वागणुकीवरील पुस्तक प्रसिद्ध झाल्यापासून या प्रश्नाला पुन्हा महत्व आलें आहें.

शारदा नाटकांतील म्हातारा पुरा पन्नास वर्षांचा देखील नाही, कारण त्याला उपदेश करण्याकरतां जो फटका लिहिलेला आहे, त्यांत ‘पन्नाशीची झुळुक लागली’ एवढेंच म्हटलें आहे, म्हणजे तो पन्नाशीच्या जवळ आला आहे अितकेंच. पण तरीदेखील रंगभूमीवर तो म्हातारा कमरेंत वांकून काठीच्या आधाराने चालतो. हल्ली तरी निदान पन्नाशीच काय, परंतु सत्तर, अैशीं, नव्वद वर्षे उलटलेले पुरुष देखील सर्वच काठी वापरतात असें नाही. अर्थात् कांही लोक लवकर म्हातारे होतात व त्यांना काठी लागेलही, पण

सामान्यतः पन्नाशी झाली म्हणून 'बाअिल दुसरी करूं नको', हा उपदेश योग्य वाटत नाही. अर्थात् त्याने चौदा वर्षांची बायको करावी की काय हा प्रश्न वेगळा. निदान हल्ली हा उपदेश हास्यास्पद आहे आणि हल्ली पुष्कळ लोक साठीच्या पुढेंही लग्न करणारे भेटतात.

यूरोपअमेरिकेंत तर अशीं उदाहरणें पुष्कळच दिसतात. प्रसिद्ध तत्वज्ञ व गणिती बरट्रँड रसेल यांनी अेशींच्या नंतर नुकताच विवाह केला, त्याला पुष्कळ लोक नांवें ठेवतात, पण त्यांची नवी बायको ५२ वर्षांची आहे हें लक्षांत घेतल्यास त्यांत कांही वावगें दिसत नाही आणि ती यापेक्षांही लहान असती तरी तो दोघांच्या मर्जीचा प्रश्न आहे.

जर्मनींत नुकतेंच अेका ७६ वर्षांच्या माणसाने २२ वर्षांच्या मुलीशीं लग्न केलें व ती अगोदरच त्याच्यापासून गरोदर झाली होती. न्यू यॉर्कमध्यें अेका मोठ्या व्यापाऱ्याने ८१ व्या वर्षी २३ वर्षांची बायको केली. त्याची पहिली बायको नेहमी आजारी असल्यामुळें त्याला मूल नव्हतें आणि ती नुकतीच मेली होती आणि हें दुसरें लग्न वारसाकरतांच होतें असें त्याने जाहीर केलें होतें. लग्नापूर्वी डाक्तरांनी दोघांनाही तपासून मूल होणें शक्य आहे असें सांगितलें होतें आणि नंतर मुलगा झालाही.

डॉ. किन्से यांनी कामक्षमतेविषयीं लिहितांना ७१ च्या पुढील सर्व पुरुषांना शून्य मार्क दिले आहेत. त्याचें मत असें आहे की जो मनुष्य कामक्षम असेल, त्याचें सकाळीं तरी उत्थापन होतें ( या वेळीं मूत्राशय बहुधा भरलेला असतो व त्याच्या दाबाने उत्थापन होतें ), तें कोठपर्यंत होतें व किती टिकतें याचाही विचार करून त्याने वरील निकाल दिला आहे, परंतु तो वरील उदाहरणांवरून चुकीचा ठरतो. अर्थात् किन्से यांनी स्वतः कबूल केलें आहे की साठीच्या पुढचे ८७ गोरे पुरुष व ३९ शिद्दी अितक्यांचीच त्यांनी तपासणी केली होती आणि ही संख्या सर्वसाधारण अनुमानें काढण्यास पुरेशी नाही.

किन्से यांच्या म्हणण्याप्रमाणें पुरुषाची कामशक्ति तिशीला सर्वांत जास्त असते आणि तेथून पुढें ती अेकसारखी कमी होत जाते. ६५ वयाला कांही शक्ति शिल्लक असल्यास सरासरीने आठवड्यांतून अेकदां समागम होतो, ७५ वयाला तीन आठवड्यांतून अेकदां आणि ८० वयाला दहा आठवड्यांतून अेकदां, समागम होणें शक्य असतें. पण सत्तरीला शेंकडा तीस पुरुष या फंदांत पडत नाहीसे होतात, ७५ वयाला शेंकडा ५५ पुरुषांचें उत्थापन होत नाही, आणि ८० ला शेंकडा ७५ कामांतून जातात. डॉ. किन्से यांना सर्वांत जास्त कामक्षम म्हातारा सांपडला तो अेक ८८ वर्षांचा शिद्दी होता व तो ९० वर्षांच्या स्त्रीशीं समागम करीत असे. अैशींच्या पुढचे बहुतेक पुरुष जरी नपुंसक असतात, तरी वयामुळें नपुंसकत्व येतें असें म्हणतां येत नाही, असें मत त्यांनी दिलें आहे.

कामक्षमता ही केवळ शारीरिक शक्तीवर अवलंबून नसते, तींत मानसिक गोष्टींचाही विचार करावा लागतो. अेकाच स्त्रीशीं ठरींव परिस्थितींत समागम करण्याचा बहुतेकांना कंटाळा येतो, परंतु त्यांना नवी बायको मिळाल्यास त्यांची शक्ति पुन्हा जागृत होते, असा अनुभव पुष्कळांना येतो. ही नवी जागृति कदाचित् अेकदोन वर्षेंच किंवा कांही महिनेच टिकेल, परंतु नवी चेतना मिळाल्याने कामशक्ति जागृत होते यांत शंका नाही. अर्थात् या शक्तींत वैयक्तिक फरक अतिशय असतो. किन्से यांनीच अेका सत्तर वर्षांच्या म्हाताऱ्याचें उदाहरण दिलें आहे, त्याचा सरासरीने आठवड्यांतून सात वेळां वीर्यपात होत असे.

पुरुषाची कामशक्ति पुष्कळ वेळां स्त्रीवर अवलंबून असते. उत्थापनाची शक्ति अितकी चमत्कारिक असते की ती क्षुल्लक कारणाने देखील तात्पुरती नाहीशी होते. पुष्कळ लोक म्हाताऱ्यांची या बाबतींत चेष्टा करतात आणि अशी चेष्टा करून घेण्यापेक्षां आपण त्या भानगडींतच पडूं नये असें साहजिकच पुष्कळांना वाटतें. परंतु त्यांना चेष्टा करण्याअैवजीं उत्तेजन देणारी स्त्री

भेटल्यास त्यांची कामशक्ति शाबूत असल्याचें दिसतें. अशी स्त्री अेखादे वेळीं समागम अयशस्वी झाल्यास पुरुषाला दोष न देतां, 'कांही हरकत नाही, पुन्हा अेखाद्या वेळीं पाहूं,' असें म्हणेल. नियमित समागमाने म्हाताऱ्याचें नुकसान बिलकुल न होतां उलट त्याचें आयुष्य वाढतें. ब्रह्मचर्याची प्रशंसा करणाऱ्या लोकांना हें दिसणार नाही, पण ही वस्तुस्थिति आहे. म्हातारीं माणसें शक्य तितकीं जगावीं अशी ज्यांची खरोखर अिच्छा असेल, ते या बाबतींत म्हताऱ्यांची चेष्टा न करतां उलट त्यांना उत्तेजन देतील. पण आज चेष्टा करण्याकडेच बहुतेकांचा कल असतो. अितर लोकांचें राहोच, पण या बाबतींत मुलें देखील बापाची चेष्टा करतात व यामुळें पुष्कळ म्हातारे आयुष्याला कंटाळतात. हें योग्य नाही, पण हें लोकांना उमजेल तेव्हां खरें.

यांत आणखी अेक मुद्दा आहे की स्त्रियांची कामेच्छा पुरुषांअितकी लवकर जागृत होत नाही. सुमारें २३ वर्षांपर्यंत स्त्रियांची कामेच्छा पूर्णपणें जागृत झालेली नसते असें आढळतें. यामुळें २३ वर्षांच्या स्त्रीने जर आपल्यापेक्षां बऱ्याच मोठ्या पुरुषाशीं लग्न केलें, तर निदान पुढील दहा वर्षें तरी त्या जोडप्याला विजोड म्हणतां येणार नाही. वर जें ८१ वर्षांच्या माणसाचें उदाहरण दिलें आहे, त्याला पत्नीची कामवासना आपल्यापेक्षां जास्त तीव्र असल्याचें दिसून आलें नाही. तो नंतर ८ वर्षांनी वारला, पण तेथपर्यंत त्याने आठवड्यांतून अेकदां समागमाचा कार्यक्रम चालू ठेवला होता व तेवढा तिला पुरेसा होता. ती विधवा झाल्यावर तिला अेखाद्या तरुणाशीं लग्न करून सुखी होतां आलें असतें. कित्येक स्त्रिया मात्र पैशाकरतां वृद्धांशीं लग्न करून, त्याला समागमास उद्युक्त करण्याकरतां फाजील चेतना देऊन, तो लवकर मरेल अशी व्यवस्था करतात. अशा स्त्रियांबद्दल मात्र सावध राहणें जरूर असतें, कारण वृद्धांना अतिरेक सोसत नाही आणि यामुळें तितका संयम नसलेले वृद्ध मात्र लग्नानंतर लवकरच अतिरेकाला बळी पडतात. परंतु संयम राखल्यास त्यांत धोका नसतो, अितकेंच नव्हे तर प्रकृतीच्या दृष्टीने फायदाच असतो. विशेषतः हल्लीच्या दिवसांत ५५ ते ८५ वयाचे

म्हातारे बऱ्याच प्रमाणांत कामक्षम असतात. मात्र त्यांना चेष्टा करणाऱ्या स्त्रिया भेटतां कामा नये. अेखादी वेश्या धंद्यांत कुशल असली, तर तिला देखील हें कळतें आणि ती अशा म्हाताऱ्यांना उत्तेजन देऊन आपलें काम साधते आणि त्यांत नुकसान कोणाचेंच नसतें. पण अर्थातच वृद्धांना वेश्यांकडे जाण्याचा धीर पुष्कळ वेळां होत नाही.

---

# ग्रंथपरीक्षण

१. **भू-दान-यज्ञ** ( हिंदी ), लेखक, आचार्य विनोबा, प्रकाशक सस्ता साहित्य-मंडल, नअी दिल्ली, पृ. ३८. किंमत ४ आणे.

२. **सर्वोदय का घोषणापत्र**, ( हिंदी ) आचार्य विनोबा के तीन भाषण. प्रकाशक, सस्ता साहित्य-मंडल, नअी दिल्ली. पृ. ६२, किंमत ४ आणे.

जुलैच्या अंकांत भूदानावर आम्ही जें मत दिलें होतें, तें पसंत न पडल्यामुळें अेका वाचकाने वरील दोन पुस्तिका आमचेकडे ‘ पूर्वग्रहविरहित वाचून विधायक टीका लिहावी या अिच्छेने ’ पाठवल्या आहेत. आचार्य विनोबा हे अतिशय विद्वान आहेत आणि स्वार्थत्यागी आहेत, अशी ग्वाही गांधीजी व काका कालेलकर यांनी ‘ भूदानयज्ञ ’ च्या आरंभीं दिली आहे. ते तसे असतील, त्याबद्दल वाद नाही. तथापि ते गांधीजींचे पट्टशिष्य आहेत, त्यांचीं मतेंही गांधींच्याच धर्तीचीं आहेत. त्यांचा उपवासावर दृढ विश्वास आहे. गांधींच्या मतांवर आम्ही अनेक वेळां टीका केली आहे, ती केवळ तीं मतें आमच्या बुद्धीला पटत नाहीत म्हणूनच आणि तशीच टीका विनोबाजींवर करावी लागते, तीही त्याच कारणाने, पूर्वग्रहांमुळें नव्हे. काका कालेलकर आपल्या परिचयलेखांत म्हणतात, ‘ उनका विश्वास है कि व्यापक

कताअी को सारे कार्यक्रम का केंद्र बनाने से ही गांवों की गरीबी दूर हो सकती है. ' अेकंदरींत हा सर्वोदयवाद म्हणजे प्रत्येक गांवाने स्वयंपूर्ण व्हावें, प्रत्येकाने आपली जमीन कसून खावें, स्वतःचीं वस्त्रें स्वतःच कापसापासून तयार करावीं, अशा उद्देशाने काढलेला आहे. आमचें मतें ही पुच्छप्रगति आहे, आजच्या जमान्याला हें जमण्यासारखें नाही, याने देशाचा कोणताही फायदा न होतां नुकसानच होईल. आजचें युग सहकार्याचें आहे, प्रत्येक गांवाने स्वयंपूर्ण होऊन जगापासून वेगळें राहण्याचें नाही. विनोबा स्वतःची तुलना वामनावताराशीं करतात. वामनाने जमीन मागितली, ती अेका बलाढ्य राजाजवळ, पण विनोबा बढाअी मारतात की मी गरिबांपासून देखील जमिनी घेतों. गांधींना भांडवलदारांचें हृदयपरिवर्तन होअील अशी आशा होती. ही गोष्ट अशक्य आहे. कांही भांडवलदारांनी त्यांना पैसे पुरवले हें खरें, पण तें कशाकरतां? गांधींना खुष ठेवण्यांत त्यावेळीं फायदा होता म्हणून. तेलंगणांत विनोबांना जमिनी मिळाल्या, त्या केवळ कॉम्युनिस्टांच्या भीतीमुळें, हृदयपरिवर्तनामुळें नव्हे. पण विनोबांना त्या कशाही मिळाल्या तरी पाहिजेच आहेत. गरिबां-कडून जमिनी घेणें हा त्यांच्यावर अन्याय आहे. हें दान घेण्यांत कमीपणा वाटतां कामा नये, असें विनोबा म्हणतात. तें मान्य केलें तरी दानावर अवलंबून राहिल्याने कांहींना अन्याय होत नाही काय? जे देणार नाहीत त्यांचें काय? जे देतील त्यांच्या जमिनी गेल्या आणि न देतील त्यांच्या तशाच राहिल्या, तर तें न्याय्य होअील काय? जमिनीची फेरवांटणी करायला पाहिजे हें कबूल केलें, तर त्याचा समंजस मार्ग म्हणजे तसा कायदा करून ज्यांच्या-कडून जमीन घ्यावी लागेल त्यांना तिचा योग्य मोबदला देऊन मगच घेणें. कॉम्युनिस्ट म्हणतात की सर्वांच्याच जमिनी हिसकाऊन घ्याव्या व मोबदला देऊं नये. हा अत्याचार होअील, पण विनोबांचा मार्ग देखील समंजस नाही आणि न्याय्यही नाही.

**र. धों. कर्वे**

---

# पत्रव्यवहार

## १

( सारांश ) १. चालू विवाहसमारंभाच्या पद्धतींत काय फरक करावा असें आपणांस वाटतें ? २. विवाह ही वैयक्तिक बाब आहे, सामाजिक नव्हे असे मला वाटतें. मुख्य पुरुषार्थ जे अर्थ व काम, त्यांपैकीं काम या पुरुषार्थाच्या शिष्टसंमत उपलब्धतेच्या प्रसंगीं, म्हणजे विवाहसमयीं आज रूढ आहे अितका गाजावाजा आवश्यक नाही असें मला वाटतें. जीवनांत कामापेक्षां अर्थालाच जास्त महत्व आहे, परंतु अर्थोपार्जनाच्या मार्गांच्या उपलब्धतेच्या प्रसंगीं अितका गाजावाजा करण्यांत येत नाही. नोकरी लागली तर चार जवळच्या मित्रमंडळीस पार्टी केली जाते, पण त्यासाठीं ठिकठिकाणीं आमंत्रणें पाठवणें, वाजंत्र्यांचा थाट किंवा विशेष पोषाख करून मिरवणें, असें कांही नसतें. त्याचें स्वरूप खाजगी असतें. नवीन दुकान उघडतांना जाहिरात करावी लागते, परंतु ती बाब सामाजिक असते, तेव्हां तें योग्यच आहे. परंतु विवाहासारखा खाजगी प्रसंग त्याच थाटानें साजरा करणें मला सर्वथैव अनुचित वाटतें. ३. विवाहप्रसंगीं आपल्या बरोबरीच्या विवाहित जोडप्यांस बोलावून व आपण त्यांत सपत्नीक सामील होऊन प्रसंगाचा आनंद लुटावा, परंतु हें सर्व खाजगी असावें असें मला वाटतें. आपलें मत काय आहे ? ४. याकरतां नोंदणीपद्धतीने विवाहविधि उरकून नंतर विवाहित जोडप्यानें मित्रमैत्रिणींस स्वहस्तें पार्टी द्यावी. वाजंत्रीं केव्हांही नसावीं, कारण त्यांनी जाहिरात होते. फारतर सारंगी किंवा व्हायोलिनसारखें संगीत असावें. आपलें मत काय आहे ? ५. बुद्धिवाद्यांच्या दृष्टीने सर्वसंमत स्वरूप ठरलें नसल्यामुळें त्यांनाही रूढ स्वरूपाचाच स्वीकार करावा लागतो. याकरतां असें स्वरूप तयार करण्यास आपण मदत करावी.

रा. स. प्रभु.

उ. १, २. आपला फार मोठा गैरसमज झालेला दिसतो. विवाहांत मुख्यत: कामाचा प्रश्न नसून अर्थाचाच असतो. म्हणूनच जुन्या काळीं आओी-बाप व हल्लीचीं वधूवरें यांचें परस्परांच्या थैलीकडेच मुख्यतः लक्ष असे व असतें. क्वचित् प्रसंगीं मुलीचें सौंदर्य पाहून गरीबीकडे दुर्लक्ष करणारेही पुरुष भेटतात, पण ते अपवादात्मक. आय्. सी. अेस्. नवरा पाहिजे म्हणून अडून बसणाऱ्या मुली, किंवा १५००० हुंडा असेल तरच मुलगी पसंत करणारे नवरे काय दर्शवतात? समाजाच्या दृष्टीनेही विवाह ही मुख्यतः आर्थिक संस्थाच आहे, कारण विवाहांतून वारसाहक्काचा प्रश्न उपस्थित होतो, आणि म्हणूनच धार्मिक लग्नांत साक्षीदार असावे म्हणून पुष्कळ लोकांना बोलवावें लागत असे आणि नोंदणीचे वेळीं साक्षीदार लागतात. हल्ली पूर्वीच्या विधीचा संक्षेप करून धर्मनिर्णय मंडळाच्या वतीने कोकजे शास्त्र्यांनी अेक त्रोटक विधि तयार केला आहे आणि विवाहाचा दाखलाही ते देतात. त्यालाही साक्षीदार लागतात व तो पुरावा होतो. सारांश विवाह हा खाजगी विधि नसून सामाजिक विधि आहे. ३, ४. गाजावाजा किती करावा हें ज्याचें त्यानें ठरवायचें असतें. कित्येकांना आपल्या श्रीमंतीचें वैभव लोकांना दाखवायचें असतें, त्यांना ही चांगली संधि असते. ज्यांना गाजावाजा करायचा नसेल त्यांनी करूं नये. ५. समाजाची घडी बदलेपर्यंत बुद्धिवाद्यांचीही नोंदणीला हरकत नसावी आणि नंतर पार्टी द्यावी की नाही किंवा केवढी मोठी द्यावी हें ज्याच्या त्याच्या अैपतीवर अवलंबून राहील. नुकताच आम्हास अेकानें प्रश्न विचारला होता की बुद्धिवादी आओीबापांनी धार्मिक विवाह-विधीला संमति दिली तर ते बुद्धिवादी कसले? यावर उत्तर असें आहे की विवाह हा मुख्यतः वधूवरांचा प्रश्न असतो, आओीबापांचा नव्हे. आपल्या मतांना चिकटून राहण्याकरतां मुलांचें नुकसान करण्याचा हक्क आओीबापांना पोंचत नाही, किंवा तेवढ्याकरतां मुलांशीं भांडण करणेंही बरें नव्हे. कित्येक सामाजिक प्रसंगीं तडजोड करावी लागते, अेरवीं समाजांत राहणें अशक्य होतें. निदान तडजोड केल्याबद्दल आम्ही कोणाला दोष देत नाही. **सं.**

२

आधुनिक लैंगिक शास्त्रांत मनोविकृतींना अधिक महत्व दिलें जातें व या विकृतींचें कारण 'प्रतिबंधक संभोग' असें मानतात. महाराष्ट्रांतील लैंगिक विषयाला वाहिलेलीं मासिकें या मानसिक विकृतींची समाधानकारक चर्चा करीत नाहीत. उडवाउडवीचाच प्रकार प्रश्नांचीं उत्तरें देतांना दिसून येतो. माझ्या पुढील प्रश्नांचीं उत्तरें आपल्या मासिकांत जागेच्या सोयीनुसार, पण शक्य तों खुलासेवार मिळावींत अशी अिच्छा आहे. १. विकृति म्हणजे काय ? २. सर्व विकृतींचा संबंध लैंगिक विषयाशींच असूं शकतो काय ? ३. अप्रतिबंधक समाजव्यवस्थेंत विकृति निर्माण होऊं शकत नाही काय ? ४. हल्लीच्या समाजरचनेंत लैंगिक विकृति शेंकडा किती लोकांत वास्तविक आहे ? ००००

उ. आपल्या भाषेचा अर्थ कळणें कठिण आहे. 'प्रतिबंधक संभोग' म्हणजे काय ? आपण जीं लैंगिक विषयाला वाहिलेलीं मासिकें म्हणतां, त्यांच्याजवळ ज्ञानाचा सांठा अितका अल्प असतो की त्यांतून कोणाला खरें ज्ञान मिळणें शक्यच नसतें. १. विकृति म्हणजे शारीरिक किंवा मानसिक रोग, कोणत्याही प्रकारचा बिघाड. २. सर्वच विकृतींचा संबंध लैंगिक विषयाशीं नसतो, पण कांहींचा असतो. ३. अप्रतिबंधक समाजव्यवस्था म्हणजे काय हें कळत नाही. म्हणजे समागमास कोणताही प्रतिबंध नाही असा अर्थ असल्यास अशा समाजांत विकृति कमी होअील, पण मुळीच नसतील असें नाही. शिवाय बिलकुल निर्बंध नाही अशी समाजव्यवस्था हल्ली तरी सांपडत नाही. कदाचित् कांही प्राथमिक गट तसे असतील, पण सुधारलेले देश नाहीत. ४. या प्रश्नाचें उत्तर निश्चित देणें अशक्य आहे, पण बऱ्याच लोकांची लैंगिक बाबतींत कांही ना कांही बिघाड झाल्याची तक्रार असते हें खरें. सं.

३

१. माझें वय २२ वर्षांचें असून प्रकृति साधारण बरी आहे. हस्त-

संभोगाची संवय १३ व्या वर्षापासून लागली. गेल्या अेकदोन वर्षांपासून स्त्रीसंभोगाची फार अिच्छा होत असे, पण लग्न करण्यासारखी परिस्थिति नसल्यामुळें अिलाज चालेना. वेश्येकडे जाणें पाप आहे असें मला वाटत नाही, पण रोगाच्या भीतीमुळें व त्या व्यवसायांतील स्त्रिया असंस्कृत असल्यामुळें मी जाण्यास तयार नसें. अशा स्थितींत अेक महिन्यापूर्वी रात्रीचें जेवण आटोपून सहज फिरावयास बाहेर पडलों असतां अेक तरुण स्त्री माझ्या पुढून जातांना दिसली. तिला पाहण्यासाठी मी जरा झपाझप पावलें टाकीत पुढें गेलों व मागें वळून पाहिलें, तेव्हां तिच्या वेषभूषेवरून ती वेश्या आहे असें वाटतें न वाटतें तोंच तिची नजर माझ्याकडे वळली व 'चला कीं' असें ती म्हणाली. नंतर मी तिच्याबरोबर थोडा पुढें गेलों व सर्व बोलणें झाल्यावर तिच्या घरीं गेलों. ती दिसावयास बरी होती व तिला रोग नसावा असें वाटलें, पण तिच्यापासून मला खरें सुख मिळूं शकलें नाही. तिनें चुंबन घेऊं दिलें नाही व तिला कसल्याही भावना नाहींत असें मला दिसलें. कारण ती नुसती पडून राहिली होती, सहकार्य करीत नव्हती. अेक मिनिटाच्या आंत पतन झालें. शिवाय तिने दिवा लावण्याचें नाकारल्यामुळें अेकंदर सर्व गोष्टींचें निरीक्षण करण्याचा माझा हेतु साध्य झाला नाही. सर्व उरकल्यानंतर मी घरीं येऊन अिंद्रिय धुवून टाकलें. रात्रीं त्याच त्याच आठवणी आल्यामुळें पांचसहा वेळां हस्तसंभोग केला. दुसऱ्या दिवशीं अिंद्रियांतून अेक रंगहीन द्रव येत असे, तथापि तो द्रव म्हणजे वीर्य नव्हे हें माहीत असल्यामुळें मी घाबरलों नाही. दुपारीं पुनः अेकदां त्याच वेश्येकडे गेलों, पण दिवसा देखील तिच्या खोलींत संपूर्ण अंधार होता व तिने आदल्या दिवशींप्रमाणेंच माझी निराशा केली. नंतर मी तिचा नाद सोडून दिला व पुनः वेश्येकडे जायचें नाही असें ठरवलें. तेव्हांपासून माझी कसलीही तक्रार नाही. यावरून मला तिजपासून रोग लागला नाही असें समजावें काय? संभोगाच्या वेळीं लवकर पतन झाल्यामुळें मला शीघ्रपतनाची संवय लागली आहे असें समजावें काय? त्यावर कांही उपाय आहे काय? पुनः वेश्येकडे जाणें

असल्यास रोगाबद्दल कोणती काळजी घ्यावी? केस काळे करण्याचा अेखादा खात्रीचा उपाय असल्यास सांगा. तुमचा क्ष.

उ. मधें अेक महिना गेला आहे, तेव्हां आतां आपणास संसर्ग झालेला नाही असें समजण्यास हरकत नाही. तथापि प्रत्येक वेळीं प्रतिबंधक मलम वापरणें बरें. असें अेक मलम आम्ही विकीत असतों ( जाहिरातींत ‘ राअिटयूब ’ पहा ). आपणास भेटलेली वेश्या अडाणीच समजली पाहिजे, कारण धंद्याच्या दृष्टीने देखील ती समंजसपणें वागली नाही. याचें कारण अशा वेश्यांना देखील गिऱ्हाअिक भरपूर मिळत असावें. अिंग्रजींत जी म्हण आहे की प्रामाणिकपणाच शेवटीं फायदेशीर ठरतो, ती याही बाबतींत खरी आहे. पण वेश्यांचे बाबतींत प्रामाणिकपणा म्हणजे काय? वास्तविक तिने पैशाचा पुरा मोबदला दिला तरच ती प्रामाणिक ठरेल. क्षणिक ओळखीवरुन भावना उत्पन्न होणें अशक्यप्राय आहे, परंतु गिऱ्हाअिकाला खुष करण्याकरतां वेश्यांना भावनांचें नाटक करावें लागतें, सहकार्य करावें लागतें व आपल्यालाही समागमांत आनंद होत आहे असें भासवावें लागतें आणि हें मोठेंसें कठिण नसतें. येथें प्रामाणिकपणा म्हणजे गिऱ्हाअिकाची या बाबतींत थोडीशी फसवणूक करणें, स्वतःला होत नसलेल्या आल्हादाचें नाटक करणें, कारण गिऱ्हाअीक याकरतांच पैसे देतो आणि नंतर तो अशा वेश्येला चिकटून राहतो. अर्थात् वेश्यांना देखील संसर्गाची भीति असते, म्हणूनच त्या चुंबनाला भितात, परंतु हें भय असूनही त्यांनी प्रतिबंधक औषधें वापरल्यास त्यांना चुंबनाला भिण्याचें कारण नाही. वास्तविक चुंबनापेक्षां संभोगापासूनच संसर्ग होण्याची भीति जास्त असते, तेव्हां संभोग करूं देऊन चुंबन नाकारणें हा मूर्खपणा आहे. सर्वच वेश्या अितक्या मूर्ख नसतात व त्यांनाच धंद्यांत वाकबगार म्हणतां येअील. सं.

---

# शारदेचें पत्र

यंदां देखील पावसाने ज्योतिषांचीं भविष्यें खोटीं केलीं आहेत. ही नेहमीच घडणारी गोष्ट आहे आणि अेखाद्याचें भविष्य खरें झालें तर तो अपवादच. पण हें ओळखून यंदां ज. स. करंदीकरांनी तरी हल्ली पावसाचा कांही अंदाजच लागत नाही म्हणून आपलें भविष्य नेहमीप्रमाणें केसरींत प्रसिद्धच केलें नाही. तरीपण श्रद्धाळू लोक वर्तमानपत्रांतलीं भविष्यें नेहमी वाचीतच असतात. आजचा दिवस कसा आहे, हा आठवडा कसा जाअील, महिना कसा जाअील, वगैरे पाहून त्यांचा काय फायदा होतो कोण जाणे! पण त्यांना तें वाचल्याशिवाय राहवत नाही.

हल्ली वर्तमानपत्रांतून जे चमत्कार प्रसिद्ध होत असतात, ते संपादकांना खरे वाटत असतील असें मला तरी वाटत नाही. अेखादा सिंह देवळांत जाऊन देवाला नमस्कार करून कोणालाही उपद्रव केल्याशिवाय सुखान्याने निघून जातो, दुसऱ्या अखाद्या देवळांत सिंहाअेवजीं अेखादा नाग येऊन नमन करून जातो, या गोष्टी अडाणी, गांवढळ लोकांनाच खऱ्या वाटायच्या. पण वर्तमानपत्रें कांही केवळ शहरांकरतांच असतात असें नाही, तेव्हां खेडवळ लोकांना तरी खऱ्या वाटतील अशा थापा कां प्रसिद्ध करूं नये, असें कदाचित् संपादकीय धोरण असावें. अेरवीं थोर मुत्सद्यांचीं भाषणें त्यांना छापावी लागतातच की नाही? आणि मुत्सद्यांचीं भाषणें म्हणजे बहुतेक थापाच असायच्या. कशावर विश्वास ठेवावा आणि कशावर ठेऊं नये, हें सामान्य वाचकांना कळणें कठिणच आहे, पण गरीब बिचाऱ्या जनावरांवर वर्तमानपत्रांनी भलतेच आरोप न केलेले बरे असें मला वाटतें. प्रतिपक्ष्यांवर भलते आरोप जरूर करावे असें अेका सद्गृहस्थांनी उघड प्रतिपादन केलेलें

आहे. पण सिंह आणि नाग हे कांही प्रतिपक्षी नव्हेत. निदान त्यांनी कोणाला त्रास दिला तर त्यांना ठार मारावें, पण त्यांची नालस्ती करण्यांत काय फायदा? त्यांच्यावर धार्मिक आचरणाचा आरोप ही नालस्तीच नाही तर काय?

आमचे नेते म्हणवणारांतही असे मूर्ख लोक असतात हेंही नुकतेंच सिद्ध झालें आहे. आंध्र प्रदेश कांग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. संजीव रेड्डी यांनी मधेंच अेकदम जी बातमी उठवली होती की आंध्रनिर्मिति ठरलेल्या वेळीं न होतां लांबणीवर पडेल, आणि जिचा केंद्र सरकारने तावड-तोब अिनकार केला होता, ती केवळ ज्योतिषाच्या आधारावर अशी त्यांनी स्वतःच कबुली दिली आहे. आणि हे गृहस्थच नव्या आंध्र प्रांताचे मुख्य प्रधान होणार असा रंग दिसतो. अशा मूर्खांच्या हातीं सत्ता गेल्यावर प्रांताचा कारभार कसा चालेल हें दिसतेंच आहे. लोक वेळेवर सावध न झाल्यास अनर्थ होण्याचा चांगलाच संभव आहे.

आपले लोक अेकंदरींत लोकशाहीला नालायक आहेत अशा प्रकारचे पुरावे दररोज अधिकाधिक मिळूं लागले आहेत. कलकत्त्याच्या ट्रॅमचे दुसऱ्या वर्गाचे दर अेक पैशाने वाढणार (तेथें ट्रॅममधें दोन वर्ग आहेत हें पुष्क-ळांना माहीतही नसेल) असें जाहीर झाल्याबरोबर तेथें जे भयंकर दंगे झाले, त्यांवरुन काय दिसतें? मद्रासची ट्रॅम खर्च भागत नसल्यामुळें बंद झाली हें अगोदरच प्रसिद्ध झालें होते, तरीदेखील कलकत्त्याच्या लोकांना ही उघड गोष्ट दिसली नाही की दर वाढवले नाहीत तर ट्रॅम अजीबात बंदच करावी लागेल. त्यांनी दंगे करून गाड्यांची बरीच मोडतोड केली, आगी लावल्या, यांत नुकसान कोणाचें झालें? हें नुकसान शेवटीं लोकांचेंच होतें हें ज्यांना उमजत नाही, ते आपली नालायकीच सिद्ध करीत नाहीत काय? येथेंही ट्रॅमचे दर वाढणार आहेत म्हणतात. येथले लोकही कांही

दंगाधोपा करणार नाहीत असा काय भरंवसा? त्यांतून अशा गोष्टींना चिथावणी देणारे कॉम्युनिस्ट तयारच असतात.

बरें कम्युनिस्टांच्या स्वतःच्या देशांत, म्हणजे रशियांत, काय चाललें आहे? स्टालीनच्या मृत्यूनंतर रशियांतल्या हुकुमशाहीच्या जाचाला कांही आळा पडेल असें वाटलें होतें, परंतु तें शक्यच दिसत नाही. जो नवा येतो तो प्रथम आपल्या शत्रूंचा नायनाट करतो आणि मग आण्खी कोणीतरी येतो तो आपल्या शत्रूंचा नाश करतो. हा म्हणे समाजवाद! समाजवादाच्या नांवावर जेथें असे अत्याचार चालतात, तो देश आमच्या भाओी-लोकांना आदर्श वाटतो. हें वेड त्यांच्या डोक्यांतून जाओील तो सुदिन. पण तो लवकर येण्याचीं बिलकुल चिन्हें दिसत नाहीत.

काश्मीरमधलीं शेख अबदुल्लांचीं कारस्थानें शेवटीं अेकदांचीं बाहेर पडलीं. त्या माणसाबद्दल अगोदरपासूनच पुष्कळांना शंका होती, पण ती बोलून दाखवायची भीति, कारण पं. नेहरूंचा त्याच्यावर विश्वास होता. निदान ते तसें म्हणत होते, तेव्हां तें खोटें कसा असेल? खोटें नाणें शेवटीं अेकदांचें खोटें ठरलें हें पाहून बऱ्याच लोकांना हायसें झालें असेल. काश्मीरच्या भवितव्यांत यामुळें फरक होणार नाही असें म्हणताहेत, पुढें काय होतें तें पहावें.

नाना प्रकारचे कर बसवून देखील सरकारची पोतडी भरत नाही. आणखी अितर प्रकारांनी जनतेला त्रास देण्याच्या युक्त्या त्यांना काढाव्या लागतात. दुधाच्या भुकटीचा सरकारचा काळा बाजार चालावा, म्हणून दुकानांत चांगलें दूध घालून चहा द्यायचा नाही असा कायदा केला, कारण भुकटी खपणार नाही. पण कांही लोक दुकानांतून कोरा चहा आणून त्यांत स्वतः चांगलें दूध घालून पिऊं लागले, तेव्हां दुकानांनी कोरा चहा विकणें हा गुन्हा आहे असा कायदा केला. कोणीकडून तरी चहाची सरकारी भुकटी

लोकांच्या घशांत जबरदस्तीने उतरवायचीच असा सरकारचा निर्धार आहे. हा जुलूम नाही तर काय? अशाने दुकानांत चहा घ्यायचाच नाही असा नियम कांही लोकांना करावा लागतो. त्यानंतर आरें येथें तयार झालेलें सरकारी दूध सर्व जगांत उत्तम असतें अशी जाहिरात सरकार करतें. पण तें सर्व जगांत महाग दुध आहे हें सांगायला ते विसरतात. अिंग्लंडांत देखील त्यापेक्षां स्वस्त दूध मिळतें. अर्थात् तें गायीचें असल्यामुळें त्यांत चरबी कमी असते, पण ती पुरेशी असते. जास्त चरबी खाण्यांत कांही विशेष फायदा असतो असें नाही. दुधाच्या सरकारी कारखान्यामुळें अेक फायदा मात्र झाला आहे की अितर व्यापारी देखील त्याच भावाने बऱ्यापैकीं दूध देऊं लागले आहेत. जुलूम सरकारने केला म्हणजे तो सहन करावाच लागतो. 'राजा लुटि जरि प्रजाजनाला' तर करणार काय? दुधाच्या भुकटीचा हा शुद्ध जुलूम आहे, त्याला दुसरें नांव नाही.

अिराणांतल्या सगळ्या उलथापालथी पाहून असें दिसतें की निदान तेथल्या लोकांना तरी आतां हुकूमशाही नको आहे आणि म्हणूनच मुसद्दिकला पळून जावें लागलें. हुकूमशहापेक्षां राजे देखील पुरवतात, कारण त्यांना जनतेची थोडी तरी लाज वाटते. रशियांतली हुकूमशाही कधीतरी नाहीशी होअील अशी आशा करयला सध्यां तरी जागा दिसत नाही आणि तरी हल्लीची स्थिति आमच्या भाअी लोकांना पसंतच आहे असें दिसतें. स्वतःची अक्कल वापरायचीच नाही असें ठरल्यावर तेथें कोणाचा अिलाज चालत नाही.

तुझी **शारदा**

---

अीश्वर सर्वशक्तिमान आहे, असें अेका मुलाला सांगितलें असतां त्याने विचारलें, "मग त्याला स्वतःला उचलतां येणार नाही अितका जड दगड त्याला उत्पन्न करतां येअील का?" अीश्वरवाद्यांनी उत्तर द्यावें.

---

**समाजस्वास्थ्य** मासिक दर १४ तारखेला टपालांत पडतें. वर्गणी रु. ३, व्ही. पी. ने रु. ३–७–०

## आमचेकडे मिळणारा माल

**लॅंबट डच कॅप,** रु. ६. **अमेरिकन,** रु. ८. **उभट टोपी,** रु. १॥. **कॉंट्रॅसेप्टॅलीन** (देशी जेली, मोठी नळी) रु. ३. **कोरोमेक्स जेली** (अमेरिकन, मोठी नळी) रु. ४॥. **पिशव्या,** प्रत्येकीं ६ आणे, ८ आणे, १२ आणे, १ रु. **भोंवऱ्याची पिचकारी,** रु. ७. **राअिटयूब** (रोगप्रतिबंधक), रु. १, डझनास रु. ११.

**राइट एजन्सी,** १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

**आयुर्वेद सेवा संघ, नाशिक,** या संस्थेने तयार केलेल्या **धातुपौष्टिक वड्या "कंदर्प वृष्य पाक".**

अर्धा शेर पाकांत सुमारें ४० वड्या येतात. १ वडी सकाळीं व १ वडी रात्रीं झोंपतांना, याप्रमाणें २० दिवस हें धातुपौष्टिक औषध खाऊन वर कप, अर्धा कप दूध पीत जावें. अेक रत्तल वड्यांची किंमत ट. खर्चासह रु. ७–१४–०. मुंबईंतील विक्री केंद्रें :– (१) दि सूर्यकिरण फार्मसी लि०, १७३ गिरगांव रोड, मुंबई–४. (२) सर्वौषधि संग्रहालय, पोलीस चौकी मारुतीजवळ, दादर, मुंबई–२८.

Registered No. B 2289.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. क्लैब्याची मीमांसा, किंमत रु. ६, ट. ख. १२ आणे
२. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु , ट. ख. ११ आणे
३. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], ५ वी आवृत्ति
किंमत रु. ४, ट. ख. ११ आणे.
४. संततिनियमन [सचित्र], मराठी १० वी किंवा हिंदी २ री आवृत्ति. किंमत सवा रुपया, ट. ख. ९ आणे.
५. गुप्त रोगांपासून बचाव, ५ वी आ.रु.१, ट.ख.९आणे
६. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग २ रा [ वर्षे ४–५–६ ], किं. २–०–०, ट. ख. ११ आ.
७. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ९ आ.
८. गुरुबाजी (नाटक), किं. ८ आ., ट. ख. ९ आणे
९. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ११ आ.
१०. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ९ आ.
११. न्यायाचा शोध (नाटक), किं १ रु., ट. ख. ९ आ.
१२. पॅरिसच्या परी (दुसरी आवृत्ति) रु. ३., ट.. ख. ११ आणे

## डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५ आ.
२. मूळव्याध, किं. ४ आ.

## श्री. शकुंतला परांजपेकृत

1. Three years in Australia, Rs. 3/15. Postage As. 11
२. पाळणा लांबवायचा कीं थांबवायचा, किं. ८ आ., ट. ख. ९ आ.

राइट एजन्सी, नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, मुंबई नं. ४.

मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई–७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई–४